**(बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या १५व्या अधिवेशनाच्या उद्घाटन सोहळ्यात अधिवेशनाचे निमंत्रक श्री. नितीन जोशी यांनी केलेले भाषण - शिकागो, २२ जुलै २०११)**

अधिवेशनाचे माननीय अध्यक्ष डॉ. काकोडकर, प्रमुख वक्ते माननीय श्री. रत्नाकर मतकरी, बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अध्यक्षा सौ. माधुरी जोशी, इतर आमंत्रित अतिथी आणि उपस्थित मराठी बंधू भगिनींनो, पुनश्च एकवार तुमचं सर्वांचं मनःपूर्वक स्वागत.

अधिवेशनाच्या शुभारंभ प्रसंगी शिकागोत स्थापन झालेल्या बृहन्महाराष्ट्र मंडळाचे दिवंगत संस्थापक कै. विष्णू वैद्य
आणि कै. शरद गोडबोले यांच्या स्मृतीस मी सर्वप्रथम वंदन करतो. मंडळाच्या संस्थापक त्रयींपैकी सौ. जयश्री हुपरीकर आज उपस्थित आहेत. संस्थापकांच्या वतीने आपले सगळ्यांचे अभिवादन स्वीकारण्यासाठी मी, जयश्री हुपरीकर, श्रीमती प्रभा वैद्य आणि श्रीमती अनिता गोडबोले यांना उभे राहण्याची विनंती करतो. धन्यवाद.

ह्या अधिवेशनांच्या निमित्ताने आपण जेंव्हा एकत्र जमतो तेंव्हा नेमकं काय शोधतो? तर आपलं मराठीपण. आपलं प्रत्येकाचं मराठीपण तपशीलाने वेगळं आहे; पण त्याचा पोत एकंच आहे. गुढ्या उभारतो, मंगलमूर्ती मोरया म्हणतो, दीपोत्सवाचा आनंद लुटतो, एवढ्यातच आपलं मराठीपण मर्यादित राह्यलय का? नक्कीच नाही. पसायदान असं नुसतं म्हटलं तर अंत:करणात एक अनामिक कळ उठते. "शंभूराजे" ही हाक आपल्याला वडिलांच्या हाकेपेक्षा जवळची वाटते. कै. पंडित भीमसेनजींचा स्वर्गीय स्वर, पु.ल. देशपांड्यांच अभिजात साहित्य, सचिन तेंडूलकरची प्रत्येक शतकी खेळी, लता-आशा ह्यांची संगीतातली दैदिप्यमान कारकीर्द इतकंच नव्हे तर सुलोचनबाइन्ची बेफाट लावणी सुद्धा. आपल्या अंत:करणात कायमचं घर करून बसलेल्या ह्या आठवणी, मर्मबंधातल्या अश्या किती ठेवी आणि त्याभोवती गुंतून पडलेल्या मराठीपणाच्या किती आठवणी. हे मराठीपण!

ह्या सगळ्यासकट आपण दूरदेशी आलोत. दुधात साखर मिसळावी तसे एकरूप झालोत पण अंतर्यामी जपलेलं हे मराठीपण विश्वात्म होण्यानं बिलकुल कमी होणार नाहीये. शिकागोत रुजलेला हा मराठी उपक्रम आज विशाल वटवृक्षाप्रमाणे विस्तृत झाला आहे हेच जगाला दाखवायला आपण इतक्या वर्षांनी इथे परत आलो आहोत. मुंबईचा, पुण्याचा, नागपूरचा, नाशिकचा, औरंगाबादचा, कोल्हापूरचा, रत्नागिरीचा अश्या असंख्य मराठी रूपांमध्ये विश्वात्म मराठी असे एक नवे सक्षम रूप उभे आहे. हा आपला सार्थ अभिमान आहे आणि तरीही अंतरी मराठी राहू हा अढळ विश्वास आहे.

हे अधिवेशन सर्वार्थाने यशस्वी व्हावे हीच ईश्वरचरणी प्रार्थना. धन्यवाद.